महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९६ वा | दिनांक : २४/०५/२०२५ | वार : शनिवार

# छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर ४ नक्षली ठार : CRPF जवानांनी घेरून मारले



**जगदलपूर** : शुक्रवारी महाराष्ट्राच्या सी-६० कमांडोंनी छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर चार नक्षलवाद्यांना ठार केले. ३०० सीआरपीएफ जवानांच्या पथकाने जंगलात नक्षलवाद्यांना घेरून ठार मारल्याचे सांगितले जात आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. ही घटना कवंडे आणि नेलगुंडा परिसरातील आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी नक्षलवाद्यांनी गुंडा परिसरात सैनिकांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला, ज्याला सैनिकांनी चोख प्रत्युत्तर दिले. सुमारे २ तासांपासून अधूनमधून गोळीबार सुरू आहे.

शोध मोहिमेदरम्यान, ४ नक्षलवाद्यांचे मृतदेह, एक सेल्फ-लोडिंग रायफल, एक ३०३ रायफल आणि एक भरमार बंदूक जप्त करण्यात आली. याशिवाय घटनास्थळावरून वॉकी-टॉकी आणि नक्षलवादी साहित्य जप्त करण्यात आले.

दुसरीकडे सुकमामध्ये पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमकही झाली आहे. दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात एक नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्त आहे. सुकमा पोलिसांनी चकमकीची पुष्टी केली आहे. सध्या शोध मोहीम सुरू आहे. अधूनमधून गोळीबार होत आहे. हे प्रकरण किस्ताराम पोलिस स्टेशन परिसरातील आहे.

# भुजबळांना मंत्रिपदानंतर खातेही मुंडे यांचेच



**मुंबई** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा अखेर सरकारमध्ये प्रवेश झाला आहे. त्यांनी मंगळवारी सकाळी राजभवनात आयोजित एका छोटेखानी समारंभात कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसींचे बडे नेते असणाऱ्या भुजबळांचा मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. त्याचा पक्षाला मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. आता त्यांच्याकडे धनंजय मुंडे यांच्याकडे असलेली अन्न व पुरवठा विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसने एका ओबीसी मंत्र्यांच्या बदल्यात दुसरा ओबीसी नेत्याला मंत्रिमंडळात स्थान देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरु केली असल्याचेही बोलले जात आहे. विशेष म्हणजे भुजबळ यांच्याकडे या आधी देखील अन्न व पुरवठा विभागाचा पदभार होता. ज्याचा शेवट चांगला, त्याचे सर्व चांगले. आतापर्यंत मी प्रत्येक जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली आहे. आताही मला जी काही जबाबदारी मिळेल ती मी नेटाने पार पाडणार असल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

७७ वर्षीय भुजबळ यांनी महाराष्ट्र मंत्रिमंडळात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते धनंजय मुंडे यांची जागा घेतली आहे. मुंडे यांनी आरोग्याच्या कारणास्तव मार्चमध्ये अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. मात्र, त्याला संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि त्यात वाल्मीक कराडची भूमिका याचीही किनार होती. त्यानंतर आता मंत्रिमंडळात नव्याने दाखल झालेले भुजबळ यांना मुंडे यांच्याकडील खाते देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.

# महाराष्ट्र पोलिस राजकारणाच्या दबावात : संजय राऊत

**मुंबई** : महाराष्ट्रातील पोलिस खाते, प्रत्येक पोलिस चौकी, प्रत्येक पोलिस स्टेशन राजकारणाच्या दबावाखालीच काम करते. हुंडाबळीच्या केसेस देखील दबावाखाली चालवल्या जात असतील, आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा देखील राजकारणात अडकलेल्या असतील, तर या महाराष्ट्रामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीमध्ये खूप चिंताजनक परिस्थिती असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. गृहमंत्र्यांना अशा घटनांचे गांभीर्य नसल्याचा आरोप देखील राऊत यांनी केला. गृहमंत्र्यांच्या कार्यकाळात अशा अनेक घटना घडल्या असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.

काल धुळ्यामध्ये पाच कोटी रुपये सापडले, तिकडे ईडी का पोहोचली नाही? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला. पाच-पन्नास हजारांची चौकशी ईडी करते, मग काल विधिमंडळ समितीच्या अध्यक्षांच्या पीएकडे पाच कोटी रुपये सापडले, तिथे ईडी का पोहोचली नाही? तिथे विरोधी पक्षाचा कोणी असते तर ईडीच्या अधिकारी कोट आणि टाय लावून तेथे पोहोचले असते, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. ईडी म्हणजे मोदी, शहा आणि फडणवीस यांच्या पिंजऱ्यातील पोपट आहे, असा आरोप देखील त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ अंदाज समितीच्या अधिकाऱ्याच्या खोलीत सापडलेल्या रक्कम प्रकरणात एसआयटी स्थापन केल्या पेक्षा गुन्हा दाखल केला असता, पीएला ताब्यात घेतले असते, तपास ईडीकडे वर्ग केला असता, तर आम्हाला आनंद झाला असता. अशा खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. या प्रकरणात त्यांनी अर्जुन खोतकर यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणात देवेंद्र फडणवीस कोणाला वाचवत आहेत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणी देवेंद्र फडणवीस हे अर्जुन खोतकर यांना वाचवत आहे का? याचा खुलासा व्हायला हवा, असे देखील ते म्हणाले.

या प्रकरणात स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीला काल मर्यादा का नाही? त्यांच्या तपासाच्या चौकटी काय आहेत? ते अद्याप आम्हाला समजलेले नाही. त्यांच्या कालावधीमध्ये ही समिती ज्या - ज्या ठिकाणी गेली, तेथे ते कोणत्या हॉटेलमध्ये किंवा विश्रामगृहात याच महाशयांनी आपल्या बॉस साठी पैसे जमा केले, याची माहिती फडणवीस यांना हवी असेल तर ती मी त्यांना द्यायला तयार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. दोन कोटी रक्कम तर शुल्लक आहे. यापेक्षा मोठी रक्कम जमा करण्याचे टार्गेट देण्यात आले होते, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

सदरील प्रकरणात आरोपी घाई घाईत रक्कम घेऊन पाळला होता. त्यावेळी जाताना त्याने गाडीमध्ये बॅगा टाकल्या. साडेपाच कोटी रुपये तो घेऊन गेला होता, असा आरोप देखील संजय राऊत यांनी केला. पाच ते साडेपाच कोटी जमा करायचे होते. उरलेली रक्कम जालन्यात जमा करायची होती. कदाचित ती जमा झाली असेल. मात्र केवळ उरलेली रक्कम हाती लागली असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. चोर कधी चोरी कबूल करत नाही. त्यामुळे हे सर्व चोर आहेत, असा आरोप देखील संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणात एकनाथ शिंदे, अर्जुन खोतकर यांच्याकडून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो, असा संशय देखील त्यांनी व्यक्त केला आहे.

गेल्या दहा वर्षात नरेंद्र मोदी, अमित शहा, संजय मिश्रा, देवेंद्र फडणवीस या लोकांनी ईडी सारख्या संस्थेचा राजकीय गैरवापर केला आहे. आपल्या विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी, त्यांचे पक्ष फोडण्यासाठी हा वापर करण्यात आला. तसेच राजकीय खंडणी गोळा करण्यासाठी देखील ईडीचा गैरवापर करण्यात आला आहे. मात्र, आता ईडीने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. त्यांच्यावर काल सर्वोच्च न्यायालयाने नेमके बोट ठेवले असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ मे २०२५


## श्री.विनय आनंदराव महाले यांना पीएच.डी. प्रदान



**कन्नड (प्रकाश खेत्री) :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने श्री. विनय आनंदराव महाले यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. श्री. विनय महाले यांनी विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ. आर. जी. दोरीक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला होता.

त्यांनी आपल्या संशोधन प्रबंधामध्ये

नॅनोक्रिस्टलिन सबस्टिट्यूटेड स्पिनेल फेराइट सिस्टिम्स" {"Characterization Studies of Some Nanocrystalline Substituted Spinel Ferrite Systems"} याविषयावर संशोधनात्मक अभ्यास केला त्यासाठी विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी बहाल केली आहे.

या संशोधन कार्यात प्रो. डॉ. के. एम. जाधव, माजी विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

श्री. विनय महाले हे कन्नड तालुक्यातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. के. महाले साहेब {औराळकर} यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्रीमंतरावजी शिसोदे , प्रचार्य डॉ. दादाराव शेंगुळे ,डॉ.रुपेश मोरे यांनी अभिनंदन केले. तसेच विविध स्तरांतील मान्यवरांकडून शुभेच्छा मिळत आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## खेळ म्हणजे एक जीवनशैली, जी आपल्याला कठोर परिश्रम आणि जिद्द शिकवते : डॉ.अ.करीम सालार



**जळगाव :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आयोजित आंतर जिल्हा राज्यस्तरीय १४ वर्षाखाली मुलांच्या फुटबॉल स्पर्धा २५ मे पासून शिरपूर येथील मिलिटरी स्कूलच्या क्रीडांगणावर होत असून त्यासाठी जळगाव जिल्हा फुटबॉल संघाची निवड सचिव फारुख शेख यांनी घोषित केली.

जळगाव जिल्हा संघ निवड चाचणी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल जळगाव येथे करण्यात आली त्यात शहजाद आरिफ खान व रेहान आझाद पटेल यांनी उत्तम कामगिरी बजावली व जिल्हा संघात आपले स्थान निश्चित केले हा संघ २४ मे रोजी जळगाव हून शिरपूरला रवाना होणार आहे.

सर्व खेळाडू आणि क्रीडा शिक्षक आमीर खान यांच्या यशाबद्दल इकरा संस्थेचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार,उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह, सचिव एजाज मलिक, प्राचार्य एस.एस.शेख,आणि सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण : सासरा राजेंद्र हगवणेसह दीर सुशील हगवणेला अटक



**पुणे :** राष्ट्रवादी अजित पवार गटाचा मुळशी तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे व त्याच्या कुटुंबीयांनी धाकटी सून वैष्णवीचा हुंड्यासाठी खून केला असा आरोप होत आहे. हगवणे कुटुंबावर गुन्हा दाखल होताच तो पसार झाला होता. त्याला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. त्याच्या सोबतच त्याचा मुलगा सुशील हगवणेला देखील स्वारगेट येथून अटक करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड बावधन पोलिसांनी ही कामगिरी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी शशांक हगवणे (२३) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. वैष्णवीच्या हत्येनंतर सासरे राजेंद्र हगवणे फरार झाला होता. त्याच्या विरोधात हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करून क्रूर वागणूक दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालात वैष्णवीचा मृत्यू गळा आवळल्यामुळे झाला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सुनेच्या संशयास्पद मृत्यूनंतर तिचा सासरा राजेंद्र हगवणे याने मुलाला घेऊन पलायन केले होते. दरम्यान, पोलिसांनी पती, सासू आणि नणंद यांना अटक करून न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने त्यांना २१ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आता सासरा आणि दीर देखील पोलिसांच्या ताब्यात आहेत.

बावधन पोलिसांनी आज सकाळी यासंबंधी एक पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत या प्रकरणी पत्रकारांच्या विविध प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता होती. पण पोलिसांनी २ मिनिटांतच आपली पीसी गुंडाळल्याने अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिले. बावधन पोलिस म्हणाले, बावधन पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी वैष्णवी हगवणे यांच्या कुटुंबातील ३ जण अटकेत होते.

उर्वरित २ आरोपींच्या अटकेसाठी वरिष्ठांच्या मार्गादर्शनाखाली ६ पथके तैनात करण्यात आली होती. या पथकाने राजेंद्र हगवणे (वैष्णवीचे सासरे) व सुशील हगवणे (वैष्णवीचा दीर) यांना आज पहाटे पुणे स्वारगेट येथून अटक केली. त्यांना न्यायालयासमोर पीसीआरसाठी हजर केले जाणार आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ मे २०२५

# तेहरान टेनिस स्पर्धेत भारतीय जोडीचे यश



**पुणे** : तेहरान (इराण) येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस १५-के स्पर्धेत भारताच्या अथर्व शर्मा (पुणे) व मान केसरवानी (लखनऊ) या जोडीने पुरुष दुहेरीचे उपविजेतेपद जिंकले. या स्पर्धेत अथर्व शर्माने मान केसरवानीच्या साथीत चमकदार कामगिरी करत व्हेनेझुएलाच्या जुआन जोश बियांची व ब्रँडन पेरेज यांना पराभूत करत अंतिम फेरी गाठली. मात्र, स्पर्धेच्या अंतिम फेरीत त्यांना भारताच्याच प्रज्वल देव आणि नितीनकुमार सिंह या जोडीकडून ३-६, ६-७ (३-७) असा पराभव स्वीकारावा लागला. एक तास ३० मिनिटे चाललेल्या या सामन्यात दोन्ही सेटमध्ये अथर्व व मान जोडीला वर्चस्व मिळवता आले नाही.

सुरुवातीला उत्तम सर्व्हिस करत या जोडीने बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रज्वल-नितीनकुमार जोडीने आपला आक्रमक खेळ कायम ठेवत गुणांमध्ये आघाडी घेतली. ही आघाडी अखेरपर्यंत अथर्व व मान यांना तोडता आली. संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करूनही अंतिम सामन्यात दोन्ही सेटमध्ये पिछाडीवर पडल्याने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तत्पूर्वी, जागतिक क्रमवारीत ५०० आतमध्ये असलेल्या जुआन-ब्रँडन जोडगोळीला अथर्व व मान या जोडीने पराभूत केले होते. सध्या अथर्व १६००, तर मान १००० व्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुरुष गटात अथर्वची ही पहिलीच अंतिम फेरी होती. आता अथर्व उझबेकिस्तान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

अथर्व शर्मा म्हणाला, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणे ही अभिमानाची गोष्ट आहे. ही आमची पहिलीच अंतिम फेरी असून, माझे आणि मानचे एकत्र खेळणे हेदेखील पहिल्यांदाच आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरुष दुहेरीत माझी ही पहिलीच अंतिम फेरी असून, ती गाठल्याचा आनंद होतोय. येत्या काही आठवड्यांत उझबेकिस्तानमध्येही मानसोबतच हे यश पुढे नेत राहायला आवडेल. या प्रवासात आम्हाला कुटुंबीय, प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन व मोलाची साथ लाभली.

# शिवराज भुमरे यांची वारकरी प्रशिक्षण शिबीरास भेट



**छ. संभाजीनगर :**

पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे यांनी पहाडसिंगपूरा येथील जनेश्वर महादेव मंदीरात चालु असलेल्या वारकरी प्रशिक्षण शिबीरास सदिच्छा भेट दिली.

ह.भ.प. मृदुंगाचार्य कृष्णा महाराज आरगडे यांच्या कडून गेल्या २४ वर्षापासून उन्हाळी सुट्टीत मुलांवर योग्य संस्कार व्हावेत आणि मोबाईल व टी.व्ही. च्या व्यसनातून मुक्तता व्हावी म्हणून या वारकरी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येते.

या प्रसंगी बोलताना संरपंच शिवराज भुमरे यांनी अशा प्रशिक्षणाची गरज असून यातून सुसंस्कृत नागरिक घडतील आणि समाज प्रबोधनाचे काम करतील. अशी अपेक्षा व्यक्त करुन मृदंगाचार्य कृष्णा महाराज आरगडे यांचे कार्य हे अतिशय प्रसंशनीय असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन शुभम कांबळे यांनी केले होते. या प्रसंगी कैलास भगत पाटील, काशिनाथ दळवी, प्राचार्य डॉ. हसन इनामदार, बाळू जाधव, वृषभ मुळे, शिवाजी गाडेकर, स्वामी आठवले, पवन सुर्यवंशी, महेश कुरील, प्रसाद हरेर, अनिकेत मापारी, प्रशांत भिंगारे, शिवराज दळवी, डॉ. किशोर होगे, डॉ. अजय पवार, रणजीत शिंदे आदी उपस्थित होते.






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २४ मे २०२५

# युद्ध जवळ आलंय : सखेद वेदनेचा हुंकार




सामाजिक चिंतन आशय संपन्न विश्वव्यापक प्रश्नांची दुखरी सल उजागर करता आहेत. कोरोना काळाने विश्वाचा विदारक चेहरा दाखवला.माणूसं मरणाचे लोंढे,प्रेतांचे ढिगारं,या तंत्रयुगाच्या चित्रमय झलकी आपण पाहिल्या आहेत.कालच्या काश्मीर पेहलगाम घटनेची जखमावळ कायमच आहे.युद्ध जवळ आलंय याची भेदक सुचकता देऊन जाते. याचपार्श्वभूमीवर विविध भाषेतील जागतिक कवीच्या कविता सविता करंजकर जमाले यांनी अनुदानित केल्या आहेत.या युद्धाच्या संभ्रमीत अवस्थेत सर्वहारा माणसाची भंयकर वेदना या कवितेचा आत्मा आहे.दुसऱ्याच्या दु:खाचा संपर्क साधला की,आपले दुर्दैवी दु:ख शुल्क वाटते.काळ फार कठीणआला,युद्ध अटळ आहे,सांगते ऐका,पण लक्षात कोण घेतो ?या युक्तीप्रमाने सविता करंजकर जमाले यांनी जागतिक पातळीवर ज्या कवीनेआपल्या सृजनशील काव्याने जो मनुष्य कायम युद्धाच्या सावटात राहिला आणि युध्दरत होऊन मातीचा झाला.या संपूर्ण युद्धाच्या कवितेचा अर्थ वलयांकित एवढाचं की,सामान्य माणसाचा कोलाहल,त्याची जगण्याची उमेद,त्याची मातीमोलआरोळी कुणीच ऐकली नाही.ती आरोळी म्हणजे या कवितेचा साक्षेपी साक्षात दाखल आहे.जागतिक युद्धाचे भयकारी चित्रण माणूस म्हणून वाचले पाहिजे.फटाके फुटताना ज्या कानठळ्या बसतात तशी ही जागतिक युद्धाची अनुवादीत कविता.

सविता करंजकर जमाले यांनी अतिशय अभ्यासपूर्ण जाणिव सजकतेने ही प्रखर कविता मांडली आहे.जग जवळ आले.आज भंयकर जत्राळलेल्या अवस्थेत सर्वहारा लोक देश विदेशाचे पर्यटन करता आहेत."व्हिजा,पिजा अन् करा मजा".माणसं मेली की, विचारांची भूत जागी होतात.ज्याचं जळतं त्यालाच कळतं.या युद्धाने विश्व विध्वंस झाला.पण सर्वहारा माणसांचा टाहो भारतभरातील कवीचा सृजन आत्मिक वेदनेचा हुंकार हा काव्य अनुवाद देऊन जातो.आजच्या वास्तवात आपण भ्रांति भ्रमीत झालो आहोत.

ही अस्वस्थ वेदनेची अनुवादित कविता.जगभरातील निवडक कसदार प्रसिद्ध कविच्या कविता हा मोठा दस्तऐवज झाला आहे.कवयित्री सविता करंजकर यांचे मनस्वी अभिनंदन.काव्य प्रतिभा अनुबंध लाभलेल्या सविता यांची ही कविता अतिशय तीव्र सखेद अनुभव देतात.अनुवाद करतांना अतिशय खोल विचारांची सृजन समर्पक विवेचक जाणीव या कवितेचा ठाव घेते.युद्धाच्या खाइतले देश,इस्त्राईल,युक्रेन सीरिया,इराण,इराक सतत युद्ध आहे.'रोज मढ तिथं कोण रडं' पण कवी दु:खाच्या अंतरात्म्यात या भंयाकित दुखरी सल उजागर करतात.दु:ख हलकं होण्यासाठी.सांगलं ते पांगलं पाहिजे.म्हणूनकविता हा एक मनोज्ञ भावनेचा आविष्कार आहे.ब्रतोलब्रेख्त,महेमूद दरवेश,ओम नागर,इव्हान बुनीन,निलम कुमार,दुन्या मिखाईल,एकूण पंचवीस कवींच्या कविता प्रातिनिधिक स्वरूपात अनुवादित केल्या आहेत. भारतीयआशियाई देश विदेशातील युद्धांच्या मानवी जखमा वजगण्याची उर्मी उमेद तख्त देऊन जाते.जर्मन कवी ब्रतोल ब्रेख्त लिहितो."पुढारी जेव्हा शांतीबद्दल बोलतातजनतेला जाणीव होते, युद्ध जवळ आल्याचीपुढारी जेव्हा युध्दाला वाईट म्हणतात तेव्हा आदेश झालेला असतो रणांगणावर जाण्याचा"(नेता आणि युद्ध) या कुटनितीचाकुटील डाव हा व्यापक आहे.शांती ही शांततेत नांदली पाहिजे.तथागतांच्या सम्यक विचार धारेचा अंत आहे.

याभांडवलीशाही वृत्तीचा चेहरा अतिशय काळाकभिन्न आहे. आरबी कवी, महेमुद दरवेश इस्त्रायली अत्याचाराच्या विरोधात लिहिले आहे "जेव्हा माती होते माझे शब्द माझी मैत्री होती गव्हाच्या ओंब्यासोबत...प्रचंड विद्रोही सनातन सत्य मातीशी इमान घेऊन मी दगड फोडतो भाकर आणि मुलांसाठी पुस्तक मिळावे म्हणून. इराक मधील दुन्या मिखाईल या कवयित्रीने आपल्या देशावर जाणिवपूर्वक लादलेलं युद्ध हे केवळ उध्वस्त जगण्याची कैफियत मांडते.सैनिकाचे युद्ध रक्त सांडते पण त्याच्या मुला बाळांचे घरादारांचे कुटुंबांच्या स्वप्नाची राखरांगोळी होते.युध्दाचे दु:ख वाटी या कवितेत,"हे आत्म्या,जा तुला शांती मिळो,तिने वाटी सरळ केली,मेणबत्ती विझवली.आणि आपल्या मुलाला हाक मारली.तो बागेत फुलपाखरे पकडत होता.गोळ्यांनी छिद्र पडलेल्या एका हेल्मेटच्या साह्याने"..युद्धांच्या देशात माणसाला माणूस म्हणून जगताना केवळ भळभळणारी जखमच वाट्याला येते.शतकानु शतकांच्या युगंधरीय युद्ध कथा कविता कादंबरी नाटक यांच्या परिप्रेक्ष्यातून पाश्चात्य कवीची राजमुद्रा कविता सविता करंजकर जमाले यांनी अतिशय अभ्यासपूर्ण काव्यकलेने अनुबंध मांडला आहे.

गुजरातीभाषेच्या कवयित्री डॉ उषा उपाध्याय लिहिते,काजळ या कवितेत काजळ त्याची निर्मिती.स्त्रीचं देखणं ते खुपणंनजर न लागन इथं युद्धांने विध्वंस दिसून येतो.हे काळ काजळ.तिची भंयकर काळीकुट्ट राख."दंगलीमध्ये कोळसा झालेली माझ्या शहरातील घरे पाहूनमनात विचार येतो, कुणाच्या पाचवीसाठी बनवलं गेलंय एवढं काजळ "..(काजळ) समकालीन वास्तव की तत्कालीन गावगाड्यांची आणि वारसा घरादाराची कशा चिंधड्या उडाल्या आहेत पंजाबी कवी डॉ.अमरजित कौंके लिहितो, घरातील अंधार अजून संपलेला नाही.गाव विकला जातोय,बस मध्ये गाणारी मुलगी या कवितेतून आजच्या वास्तवाचे विदारक चित्र आले आहे.देश असो की प्रदेश या दु:खाची कळ,ठणक एकच आहे.मातीचा माणूस मातीवर नाही."अंधाराच्या या जंगलातून बाहेर पडण्यासाठी,तळमळतो रडू लागतो.मी घरातून बाहेर पडतो तेव्हा घरातील अंध:कार आजही माझ्या सोबत चालतो"(घरातील अंधार)या कवितेचा घनतिमिर काळ हा अक्राळविक्राळ स्वरूप धारण करणारा आहे.कवी हा काळाचे 'मानवसृष्टी'चे भाकित करतो.म्हणजे ही कविता अतिशय दुरदृष्टीने विचार परिशीलन करते.यातील कवितेचा भारतीय भाषिक प्रादेशिक भूभागाची भुमिका घेऊन आलेली कविता आहे.जसे, आसामी कवी निलिम कुमार "सुंदर बायका, यात्रा, घर, प्रेमपत्र आजच्या तंत्र युगाची शहरी मांदियाळी प्रचंड झगमगाटी जगणं म्हणजे सुंदर बायका शहराची शिकार करतात, आणि अंतिम चिंतन आशय असा आहे "एक खोली वाचन, एक खोली जेवण, एक खोली गाणं, दुसऱ्या खोलीत झोपी जातो.माझ्या ह्रदयाच्या चारही खोल्या ज्यांनी व्यापून टाकल्या ते दुसरं कुणीच नाही ते माझे दु:ख आहे "(घर)हा कवितेचा मर्मग्राही आरसा आहे.सारं नी सगळचं आहे.पण या युद्धाने व्यापलं आहे.

'सुख पहाता जवा पाडे, दु:ख पर्वता एवढे'.ही सखेद भावना कवीने व्यक्त केली आहे.कवी निजार कब्बानी सिरियातील अरबी स्त्रीयांचे दास्यत्व अधोरेखित केले आहे.एका वेड्या बाईचे पत्र,संतप्त पिढी हवीय,दिव्याहून अधिक मौल्यवान असतो प्रकाश "मालक, मला फरक पडणार नाही.तुमच्या मनात येईल ते बोला मला.कारण बाई जेव्हा लिहिते तिच्या मनातल्या गोष्टी.पुरूषी तर्क तिला वेडी ठरवतात.मी एक वेडी बाई आहे"(एका वेड्या बाईचं पत्र)भारतीय मराठी कवितेची देशव्यापी संकल्पना वाड्मयीन मूल्यमापनाच्या अधिष्ठानाने ही कविता एक सामाजिक सृजनशील चिंतनाचा विषय आशय आहे.कवितेचा अनुबंध बांधतांना अत्यंत निखालसपणे कवितमय होऊन जाणे.भाषिक कौशल्याचा अभ्यास करून ही अनुवादची अनुभूती ही कविता देते.

मुक्त व्यक्त होतं ही कविता नाही तर,अंतरंगी गेय लय लक्षवेधी असल्याने काव्यमय होऊन या अनुभवाधिष्टीत कवितेला न्याय मिळाला आहे.ही अनुवादित कविता निस्सीम काव्य भक्तीचा प्रत्यय देते.आपण आपला सभोवतालं आणि सामाजिक सांस्कृतिक संस्कार मन व्याप्तृत आहे.या काव्य अनुवादाने निश्चित भूमिकेतून येणारी परभाषिक कविता कोणते प्रश्न उजागर करते? तिथल्या व्यथा वेदनांचा प्रदेश याची भेदक सूचक नजर या कवितेने कळते."कवितेतून मांडलेला अनुभव आशय हा वैश्विक आहे.जगभरातल्या कवीचा सृजन समर्पक भावविश्व हे व्यापक स्वरूप होतं ते घेतांना मांडलेली वेदना किती दहा देणारी दंश करू शकते याचा अनुभव.

जगभरातलं हे संचित अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठीतही आणलं पाहिजे ही भावना प्रबळ झाली.अत्तराच्या कुपितलं अत्तर दुसऱ्या कुपित टाकलं तरी त्याचा सुगंध बदलत नाही.तसचं अनुवादचही असावं हे अभ्यासू मनोगत अत्यंत समर्पक आहे.या जगभरातील कवीच्या कविता सविता होऊन सार्थ झाल्या आहेत.एका युद्धामुळे काय काय उलथापालथ होते.ज्यांनी युद्धाचे चटके सोसले त्यांच्या कडून युद्ध समजून घेतांना मी आतल्या आत रडत होते.तितकीचं दाहकता पोटाची खळगी भरण्यासाठी सर्वहारा सामान्य शेतकरी, कष्टकरी मंजूर महिलांच्या लढाईच्या कविता अतिशय दहाक आहेत.विषमतेचा लढा हा मानवतेला कलंक आहे या प्रज्ञावंत जाणिव या कवितेने दिली आहे.कवी साक्षेपी समीक्षक प्रा.संतोष पद्माकर पवार यांची चिंतन चिकित्सक प्रस्तावना ही या कवितेची जोरकस बाजू आहे.

ते लिहितात "भांडवली अर्थव्यवस्था आणि नफेखोर गुन्हेगारी माफियांनी या जगात युद्धभूमी कायम पेटती राहिलं याची काळजी घेतलीआहे.देशसीमांचे निमित्त करून वर्णद्वेष,वर्गद्वेष,जातीय द्वेष, तसेच अंतर्गत गृहकलह माजवून कायम ठेवला आहे". युद्ध आणि त्या बाबतच्या अस्वस्थ विषयांच्या सोबतीने आकाराला आलेल्या सविता करंजकर जमाले यांच्या 'युद्ध जवळ आलंय..हा अनुवाद संग्रह मराठीत एक महत्त्वाचा दस्तावेज तयार झाला आहे असे म्हणता येईल "जगभरातील निवड प्रसिद्ध कवींच्या कवितांचा अनुवाद साक्षेपी प्रकाशक सन्मित्र संतोष तांबे 'दखनी स्वराज्य'संस्थेच्या माध्यमातून देखणा कविता संग्रह दिला आहे. आशय संपन्न मुखपृष्ठ बुद्धभुषण आनंद लोंढे यांचे आहे.कवयित्री सविता करंजकर जमाले यांचे मन:पूर्वक अभिनंदन व स्वागत.

**युद्ध जवळ आलंय**
**सविता करंजकर जमाले**
**अनुवादीत कविता**
**प्रकाशक**
**दखनी स्वराज्य.**
**संतोष तांबे**
**प्रथम आवृत्ती:-डिसेंबर २०२४**
**किंमत:-२०० रूपये**



**पुस्तक परिचय:-**
**डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**संवाद:-९९ ७५ १३ ७३ ३७**